
# २. बोलणारी नदी

एक होती मुलगी. तिचे नाव लीला. होती ती चौथीत अन् होती भारी खोडकर. लोकांना त्रास द्यावा असे तिला नाही वाटायचे, पण तिला खोड्या काढण्याची भारी हौस. स्वतःच्या मनात येईल ते करायची तिला इच्छा असायची. त्यासाठी मजेशीर युक्त्या शोधायची. तिचे घर होते गावाच्या एका टोकाला. तिच्या घराच्या मागील वावराच्या बाजूला थोडेसे चालत गेले की नदी होती.



एक दिवस लीलाला बर्फाचा गोळा खावासा वाटला. आई म्हणाली, ‘‘नको खाऊ.’’ ताई म्हणाली, ‘‘नको खाऊ.’’ माई म्हणजे तिची आजी म्हणाली,

*‘‘ लीला गं लीला,*
*नको खाऊ गोळा,*
*दुखेल तुझा गळा.*
*सगळं पाणी होईल,*
*नाकात गोळा !’’*


आता काय करावे बरे ? लीला विचार करू लागली. तिला एक युक्ती सुचली. ती नदीकडे गेली. नदीला म्हणाली, ‘‘नदी गं नदी !’’ पण नदी बोलणार कशी ? मग ती स्वतःच म्हणाली, ‘‘बोल गं लीला.’’ मग लीला म्हणाली, ‘‘नदी गं नदी, लीलाला खायचाय बर्फाचा गोळा; पण माई म्हणाली, दुखेल गळा. खाऊ का नको ?’’ पण नदी कशी बोलणार ? परत लीलाच म्हणाली, ‘‘मग खा की. पळत जा अन् पटकन खा.’’ लीला म्हणाली, ‘‘अगं, पण तुझं कसं ऐकू ? ताई म्हणाली, नको खाऊ. आई म्हणाली, नको खाऊ. माई म्हणाली, नको खाऊ.’’ पण नदी कशी बोलणार ? परत लीलाच म्हणाली, ‘अगं, ताईपेक्षा मोठी आई. आईपेक्षा मोठी माई. पण माईपेक्षाही मोठी मी – नदीबाई. माझं ऐक.’’ ‘‘बरोब्बर !’’

लीला पळत बर्फवाल्याकडे गेली. गोळा खाऊन परत आली. तिला बोलणारी नदी खूप आवडली. ताई, आई, माई यांच्यापेक्षा मोठी नदीबाई. तिची परवानगी मिळाली, की आपण हवे ते करू शकतो, असे तिला वाटले.

एक दिवस लीलाला आला कंटाळा. तिला वाटले बुडवावी शाळा. तिने ताईला विचारले. ताई म्हणाली, ''नको बुडवू शाळा.'' आई म्हणाली, ''नको बुडवू.''

माई म्हणाली,

*''लीला गं लीला,*
*आला जरी कंटाळा,*
*बुडवू नकोस शाळा.*
*शिकूनसवरून होशील*
*सुखी माझ्या बाळा.''*



लीला चिडली. कुणीच कसे शाळा बुडवू देत नाही ? 'शाळेला जाते', असे सांगून ती नदीकडे गेली. नदीला म्हणाली, ''नदी गं नदी, लीलाला आलाय कंटाळा, बुडवावी वाटतेय शाळा. काय करू?'' पण नदी कशी बोलणार ? मग लीलाच बोलली, ''आलाय जर कंटाळा, तर बुडव बिनधास्त शाळा.''

ताई, आई, माईपेक्षा मोठ्या नदीबाईने परवानगी दिली म्हटल्यावर लीला शाळेला गेली नाही. दिवसभर नदीकाठी, वावरात खेळत राहिली. संध्याकाळी घरी आली. तिची ताई तिच्याच शाळेत सातवीत शिकत होती. लीलाने शाळा बुडवल्याचे तिला कळले होते. तिने आई अन् माईलापण सांगितले होते. त्या तिघींना लीलाची 'बोलणारी नदी'पण माहीत झाली होती. त्या तिघींनी लीलाची गंमत करायचे ठरवले. तिला शाळा बुडवल्याबद्दल कुणीच काही बोलले नाही.

काही दिवसांनी आला भोला. भोला म्हणजे लीलाचा मामा. भोलामामा नेहमी खाऊ घेऊन यायचा. त्या दिवशी नेमकी लीला शाळेत निघाली तेव्हा तिचा मामा आला. लीलाला खूप आनंद झाला. ''काय खाऊ आणलास ?'' तिने विचारले.

भोलामामा म्हणाला,

*''लीला गं लीला,*
*माझ्या लाडक्या बाळा,*
*खाऊ म्हणून आणलेत*
*बदामी पेढे सोळा !''*

'सोळा पेढे ! ते पण बदामी !' लीला एकदम खूश झाली; पण शाळेला जायला उशीर होत होता म्हणून ती पळाली. ''संध्याकाळी आल्याबरोबर मी पेढे खाणार !'' लीला ओरडतच गेली. शाळेत दिवसभर तिच्या डोळ्यांसमोर पेढे नाचत होते. ''पेढे कुठे आहेत ?'' लीलाने आल्याबरोबर विचारले. आई म्हणाली, ''शिंकाळ्यावरच्या बुट्टीत डबा ठेवलाय बघ !'' लीलाने स्टूल घेऊन डबा काढला. उघडून पाहते तर डबा सगळा रिकामा. ''आईऽऽ, यात तर एकपण पेढा नाही !'' लीला ओरडली. लीलाचे ओरडणे ऐकून आईला नवल वाटले. आई म्हणाली, ''अगं, असं कसं होईल ?'' तिने ताईला हाक मारली, ''नीला, ए नीला.'' ''काय गं आई?'' नीला परसातून पळत आली. ''अगं, पेढे कुठे गेले ?'' आईने विचारले. ''कुठे गेले म्हणजे मीच खाल्ले. मी खाल्ले आठ अन् नदीला दिले आठ.'' नीला म्हणाली.

''तू बदामी पेढे नदीत टाकलेस ! मूर्ख कुठली.'' आई नीलावर ओरडली. ''अगं हो. तू म्हणालीस,



पेढे नको खाऊ. माई म्हणाली, पेढे नको खाऊ. मग मी नदीबाईला विचारलं. नदी म्हणाली,

*''नीला गं नीला,*
*पेढे आहेत सोळा.*
*तू घे आठ, मला दे आठ.''*

''अगं, पण नदी कशी बोलेल ?'' माई अन् आई एकदम म्हणाल्या. ''कशी म्हणजे ? लीलाशी बोलते तशी !'' नीला म्हणाली.

''काय गं लीला, नदी तुझ्याशी बोलते ?'' माईने विचारले.

''अगं माई, तीच तर लीलाला गोळा खायला सांगते. शाळा बुडवायला सांगते. हो की नाही गं लीला ?'' नीला मध्येच बोलली.

लीला आता चिडली. तिची खोडी तिच्यावरच उलटली होती. आता काय करावे बरे ? तिने थोडा विचार केला अन् म्हणाली,

*''ताई, आई, माई,*
*समजलं गं बाई,*
*नदीशी बोलायला*
*आता जाणार नाही !''*

माई हसत कपाटाकडे गेली अन् डबा घेऊन आली.

*''लीला अन् नीला,*
*घ्या एकेक पेढा अन्*
*खेळायला पळा !''*

''पेढा मिळालाऽऽ'', असे म्हणत पेढा घेऊन लीला गोठ्याकडे पळाली.

''आता ही काय म्हशीला बोलायला लावणार की काय !'' माई हसून म्हणाली.

**शब्दार्थ :** **वावर –** शेत, शिवार. **बिनधास्त –** बेफिकीर, कसलीही काळजी न करता. **शिंकाळे –** छताला टांगलेले दोरीचे जाळे. यात दही, दुधाची भांडी ठेवतात. **बुट्टी –** बांबूची टोपली. **परस –** घरामागची मोकळी जागा.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) लीलाला कसली हौस होती ?
(आ) लीलाला काय खायचे होते ?
(इ) नदीबाई कोणाकोणापेक्षा मोठी होती ?
(ई) आईने पेढ्यांचा डबा कोठे ठेवला होता ?
(उ) पेढा घेऊन लीला कोठे गेली ?

**प्र. २. खालील प्रश्नांची उत्तरे तुमच्या मनाने लिहा.**

(अ) तुम्हांला काय खावेसे वाटते?

(आ) घरातील मोठी माणसे कोणते पदार्थ खाऊ नयेत, असे सांगतात ?

(इ) तुम्हांला कंटाळा आल्यावर काय करावेसे वाटते ?

**प्र. ३. दोन अक्षरी शब्द – गळा, तीन अक्षरी शब्द – घोटाळा, चार अक्षरी शब्द – घळाघळा यांसारखे शेवटी 'ळा' हे अक्षर येणारे प्रत्येकी चार शब्द लिहा.**

**प्र. ४. कोण, कोणाला म्हणाले ?**

(अ) ''नको बुडवू शाळा.''

(आ) ''काय खाऊ आणलास ?''

(इ) ''तू बदामी पेढे नदीत टाकलेस !''

(ई) ''काय गं लीला, नदी तुझ्याशी बोलते ?''

**प्र. ५. खालील शब्दांचे अनेकवचन करा.**

(अ) डबा (आ) बैल (इ) नदी (ई) डोळा (उ) दिवस (ऊ) पेढा

947KL8

**प्र. ६. लीलाप्रमाणे तुम्हांला नदीशी बोलायचे असेल, तर तुम्ही नदीशी काय बोलाल ?**

**प्र. ७. या पाठात 'वावर' हा शब्द आलेला आहे. वावर या शब्दाचे दोन अर्थ सांगणारी खालील वाक्ये वाचा.**


- रामजीच्या वावरात कापसाचे पीक आहे. (वावर–शेत)
- सरपंचांच्या घरात लोकांचा नेहमी वावर असतो. (वावर–वर्दळ, ये–जा.)

याप्रमाणे दोन अर्थ असलेले पाच शब्द शोधा. प्रत्येक शब्दाचे दोन अर्थ दाखवणारी वाक्ये लिहा.

**उपक्रम :** शिक्षक किंवा पालक यांच्यासोबत तुमच्या गावातल्या नदीवर जा. नदीचे निरीक्षण करा. वहीत नोंदवा.



## आम्ही संवाद करतो











- **वरील चित्रांतील पक्षी व प्राणी आपल्या पिलांशी काय बोलत असतील याची कल्पना करून त्यांच्यातील संवाद लिहा.**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करायला सांगावे. तुम्ही घरी तुमच्या आई-बाबांशी काय काय बोलता, त्यांना काय काय सांगता ते विद्यार्थ्यांना विचारावे. विद्यार्थ्यांनी लिहिलेले संवाद त्यांच्याकडून साभिनय म्हणून घ्यावे.